# अमर हिंद मंडळ, दादर

## स्थापना : २६ जानेवारी १९४७

सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९

## ६९

# वार्षिक अहवाल

## २०१५ - २०१६

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई-४०० ०२८. दूरध्वनी : २४२२ ३५ ८९, २४२१ ९० ११

# अमर हिंद मंडळ, दादर

### विश्वस्त मंडळ आणि कार्यकारी समिती

### दिनांक १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६




**दिनकर शंकर पाटील**
विश्वस्त



**उषा शशिकांत मेहता**
विश्वस्त



**रमेश माधवराव वरळीकर**
विश्वस्त



**भास्कर जयराम सावंत**
अध्यक्ष




**चिंतामणी विश्वनाथ नागले**
उपाध्यक्ष



**उर्मिला उमेश शेणॉय**
उपाध्यक्ष



**दीपक नारायण पडते**
कार्याध्यक्ष



**अरुण अनंत देशपांडे**
कार्योपाध्यक्ष

कार्यकारी समिती पदाधिकारीं फेरबदल दि. ३१ ऑगस्ट २०१५ पासून.



**श्रीकृष्ण शंकर राणे**
कार्यवाह



**प्रफुल्ल दामोदर पाटील**
संयुक्त कार्यवाह




**सीमा चंद्रशेखर कोल्हटकर**
कोषाध्यक्ष



**सतीश शरश्चंद्र रेडीज**
कार्यकारी सदस्य



**दत्ता अनंत सावंत**
कार्यकारी सदस्य



**संजय विठ्ठल पेडणेकर**
कार्यकारी सदस्य



**विजय प्रताप राणे**
कार्यकारी सदस्य



**दीपक नारायण नाडकर्णी**
कार्यकारी सदस्य




**विलास प्रभाकर कारेकर**
कार्यकारी सदस्य

## अमर हिंद मंडळाचा स्नेह मेळावा नाटक शेवग्याच्या शेंगा



















## अमर हिंद मंडळाच्या कार्यक्रमांची क्षणचित्रे














## आधार संस्था (बदलापूर) कार्यकारी समिती, पदाधिकारी, सदस्य यांची भेट.





# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई – ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २५/०९/२०१६ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष श्री. भास्कर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :–

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन २०१५–२०१६ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन २०१५–२०१६ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन २०१६–२०१७ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन २०१६–२०१७ चे अंदाजपत्रक मंजूर करणे. (परिशिष्ट ब)

६. निधीत रक्कम वर्ग करण्याबाबत ठराव मंजूर करणे.

७. कार्यकारी मंडळाने शिफारस केलेल्या पोटनियम बदलावर चर्चा करुन मान्यता देणे.

८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने

दिनांक : १२/०८/२०१६

श्रीकृष्ण राणे
कार्यवाह

**सूचना :**

१) गणपूर्तीचे अभावी नियोजितवेळी सभा सुरु न झाल्यास सभा स्थगित करण्यात येईल, ही स्थगित सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वा. भरेल व ही सभा पूर्णपणे वैध असेल.

२) सभासदांना अहवाल, हिशेब, अंदाजपत्रक, संस्थेच्या कामकाजासंबंधी सभेत प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी मंडळाच्या कार्यालयात लेखी स्वरुपात शनिवार, दि. १७ सप्टेंबर २०१६ पर्यंत सायं. ६ ते ८ या वेळेत (रविवार व्यतिरिक्त) सादर करावेत.

३) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत तसेच हयात नसलेल्या सभासदांच्या संबंधितांनी तत्सबंधीची माहिती कार्यालयात कळविण्याची कृपा करावी.

४) सर्वसाधारण सभेसाठी येताना कृपया हा अहवाल सोबत घेऊन यावा.

# वार्षिक अहवाल

## (१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६)

सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,

सादर वंदे,

मंडळाचा ६९ वा वार्षिक अहवाल जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

दि. २६ जानेवारी २०१६ रोजी मंडळाच्या स्थापनेला ६९ वर्ष पूर्ण झाली. प्रजासत्ताकदिनाचे ध्वजारोहण ज्येष्ठ क्रीडा पत्रकार श्री. वि. वि. करमरकर यांचे हस्ते करण्यात आले. तद्नंतर मंडळाच्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाच्या तहहयात सभासद, खेळाडू, कलाकार यांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर करुन कार्यक्रम यशस्वी केला.

अहवाल काळात मंडळाने आंतरशालेय कबड्डी, खोखो, लंगडी स्पर्धा, कै. आबा पडते राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा, कै. विनोद हडप राज्यस्तरीय मराठी एकांकिका लेखन स्पर्धा, कै. उमेश शेणॉय आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन यशस्वीपणे केले.

मंडळ आयोजित करीत असलेल्या कला, क्रीडा, समाजकल्याण, शैक्षणिक, वैद्यकीय कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा यांमध्ये अहवाल काळात सातत्य राखण्यात आले. इमारत डागडुजी अंतर्गत करण्याची कामे लवकरच कार्यान्वित होणार आहेत. आगामी काळात देखील मंडळ आपली प्रतिमा अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करणार आहे.

## मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे :-

**सभा :-** अहवाल कालावधीत कार्यकारी समिती सभा १४ झाल्या आणि विश्वस्त, अध्यक्ष, उपाध्यक्ष व कार्यकारी समिती यांच्या ५ संयुक्त सभा झाल्या (संयुक्त सभा आणि कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट 'अ' पहावे.)

**मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा :-** मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि.२३ ऑगस्ट २०१६ रोजी संपन्न झाली. या सभेस एकूण ९७ तहहयात सभासद उपस्थित होते.

**विगतवारी निधी :-** अहवाल काळात वैद्यकीय निधीत १०,००,०००/-, शैक्षणिक निधीत १०,००,०००/-, समाज कल्याण निधी ५,००,०००/- इमारत निधी २०,००,०००/- एकूण ४५,००,०००/- (रुपये पंचेचाळीस लाख फक्त) वर्ग करण्यात आले.

**कॅटरिंग व्यवस्था :-** १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीसाठी "न्यु मयुर कॅटरर्स ॲण्ड डेकोरेटर्स" यांना संपूर्ण कॅटरिंग, डेकोरेशन व्यवस्थेसाठी ठेकेदारी देण्यात आली.

# -: उपक्रम आणि कार्यक्रम :-

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १ | ६८ वी वसंत व्याख्यानमाला | | |
| | बुधवार दि. २२ एप्रिल २०१५ | 'आनंदवन - प्रयोगवन' | डॉ. विकास बाबा आमटे |
| | गुरूवार दि. २३ एप्रिल २०१५ | ग्राहक चळवळीतील माझी मुशाफिरी | ॲड. शिरीष देशपांडे |
| | शुक्रवार दि. २४ एप्रिल २०१५ | 'मुंबईचा विकास' | श्री. चंद्रशेखर प्रभू |
| | शनिवार दि. २५ एप्रिल २०१५ | 'बदलत्या समाजातील स्त्री चे स्थान' | ॲड. जाई वैद्य |
| | रविवार दि. २६ एप्रिल २०१५ | 'सुदृढ शरीर आणि दीर्घायुष्य' | डॉ. प्रेमानंद रामाणी |
| | सोमवार दि. २७ एप्रिल २०१५ | चला समजून घेऊ या .. उत्तर - पूर्वांचल भारत | श्री. नितीन गोखले |
| | मंगळवार दि. २८ एप्रिल २०१५ | ''किती रे तुझे रंग''.. | श्री. रत्नाकर मतकरी यांची मुलाखत<br>मुलाखतकार : श्री. गणेश रत्नाकर मतकरी |
| | बुधवार दि. २९ एप्रिल २०१५ | 'सुफी आणि गझल' | पंचम निषाद प्रस्तुत..<br>श्रीमती पूजा चरण.. ह्यांचा बहारदार कार्यक्रम |
| २ | १४ एप्रिल ते १ मे २०१५ | बालनाट्य प्रशिक्षण शिबीर ४० शिबीरार्थींचा समावेश | संचालिका : लीला हडप<br>मार्गदर्शक : दत्ता सावंत, शिवदास घोडके, संजय क्षेमकल्याणी, मृणाल चेंबुरकर, सीमा पारकर<br>प्रमुख पाहुणे : भास्कर सावंत |
| ३ | ३ मे २०१५ | स्नेहमेळावा | तहह्यात सभासद, खेळाडू, कलाकार, हितचिंतक, कार्यकर्ते यांच्यासाठी<br>चिंतामणी निर्मित : **शेवग्याच्या शेंगा** नाटकाचा प्रयोग |
| ४ | २७ व २८ जून २०१५ | विचार मंथन (चर्चासत्र) | मंडळाचे विश्वस्त, कार्यकारी समिती, पदाधिकारी आणि सदस्य यांचे चर्चासत्र<br>गुलीस्थान विश्रामगृह : खंडाळा |
| ५ | १८ जुलै २०१५ | सांस्कृतिक अमावस्या | हिंदी दीर्घांक |
| ६ | १ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०१५ | नाट्यतंत्र प्रशिक्षण कार्यशाळा (रविवार) | संचालिका : लीला हडप<br>मार्गदर्शक : दत्ता सावंत, शिवदास घोडके, संजय क्षेमकल्याणी, मृणाल चेंबुरकर, संजय डहाळे |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| ७ | १५ ऑगस्ट २०१५ | स्वातंत्र्यदिन व कै. म. ज. फडके स्मृतिदिन | प्रमुख पाहुणे : मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. दिपक पडते तद्नंतर ज्येष्ठ तहहयात सभासदांचा सत्कार, खेळाडू, कलाकार यांचा गुणगौरव |
| ८ | २८ ऑगस्ट २०१५ | काटा रुते कुणाला अ. भा. मराठी नाट्य परिषद एकांकिका स्पर्धा | प्रणाली कदम, ऐश्वर्या सक्रे, अमित सोलंकी |
| ९ | २६ सप्टेंबर २०१५ | ''भेट'' : कल्पना एक अविष्कार अनेक एकांकिका स्पर्धा | लेखक, दिग्दर्शक : दत्ता सावंत कलाकार : हर्षद शेटे, गौरी बोरकर |
| १० | २/३/४ ऑक्टोबर २०१५ प्रथम फेरी | कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा | प्रथम फेरी परीक्षक : भालचंद्र झा, उदयचंद्र कबडी अंतिम परीक्षक : इला भाटे, डॉ. अनिल वांदिवडेकर, गिरीश पतके |
| ११ | ८ ऑक्टोबर २०१५ अंतिम फेरी | कै. आबा पडते राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा श्री शिवाजी मंदिर | प्रमुख पाहुणे : मा. श्रीमती स्वाती चिटणीस प्रथम : तो पाऊस आणि राफेटा द्वितीय : सेल्फी, तृतीय : साखरक्षण |
| १२ | ८ ऑक्टोबर २०१५ अंतिम फेरी | कै. विनोद हडप राज्यस्तरीय मराठी एकांकिका लेखन स्पर्धा | परीक्षक : अवधूत भिसे, मानसी राणे प्रथम : डेथ सर्टीफिकेट द्वितीय : उपकृत तृतीय : लछनी/एल.ओ.सी |
| १३ | १३ ऑक्टोबर २०१५ | मिती क्रिएशन व अमर हिंद मंडळ यांच्या संयोजनाने सत्कार सोहळा | संयोजक : उत्तरा मोने समाजातील अपंग व्यक्तींनी केलेल्या समाजकार्याचा कौतुक समारंभ |
| १४ | १७ ऑक्टोबर २०१५ | विघ्नहर्ता सेवा संघ भेट एकांकिका | लेखक – दिग्दर्शक : दत्ता सावंत कलाकार – हर्षद शेटे, गौरी बोरकर |
| १५ | २२ नोव्हेंबर २०१५ | दंत चिकित्सा शिबीर | डॉ. सोनाली राणे, डॉ. तन्वी राणे, डॉ. रोहित वेदपाठक |
| १६ | २५ नोव्हेंबर २०१५ | मन शक्ती केंद्र | मनशक्ती केंद्र प्रकाशित पुस्तकांचे वाटप |
| १७ | ३० नोव्हेंबर २०१५ | शूरा आम्ही वंदिले | कारगील युद्धातल्या सैनिक दलातील अनुभवाची गाथा व्याख्याते : श्रीमती अनुराधा गोरे |

| अ. क्र. | तारीख | कार्यक्रम/ उपक्रमांचे नांव | तपशील |
|---|---|---|---|
| १८ | १ डिसेंबर २०१५ | महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा | सफाई कादंबरीवर आधारीत 'लेक माझी गुणाची'<br>लेखक : सुमेध नाट्य रुपांतर : राज वि. जोशी<br>दिग्दर्शक : सुहास विरकर, मंडळाचे ४० कलाकार |
| १९ | ५ जानेवारी २०१६ | महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा | 'दोन बच्चे, दोन लुच्चे'<br>लेखक : रत्नाकर मनकरी<br>दिग्दर्शक : भूषण गमरे |
| २० | ०८ जानेवारी २०१६ | सांस्कृतिक अमावस्या काव्यसंध्या | स्व. मंगेश पाडगांवकरांना आदरांजली<br>कलाकार : कविवर्य श्री. अशोक नायगांवकर, श्री. अरुण म्हात्रे, श्री. संजय गवंडे |
| २१ | २६ जानेवारी २०१६ | प्रजासत्ताक दिन, मंडळाचा वर्धापनदिन | ध्वजारोहण प्रमुख पाहुणे : वि. वि. करमरकर<br>कलाकार, खेळाडूंचा सांस्कृतिक कार्यक्रम |
| २२ | ३० जानेवारी २०१६ | कै. उमेश शेणॉय राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा | परीक्षक : श्री. सौमित्र पोटे, श्रीमती योगिनी राऊळ<br>प्रथम : कु. सोमेश कोलगे<br>द्वितीय : कु. विशाखा गढरी<br>तृतिय : कु. काजल बोरस्ते<br>उत्तेजनार्थ : कु. प्रविण शिंदे, कु. रमेश कोळी |
| २३ | २७, २८ फेब्रुवारी २०१६ | विचारमंथन शिबीर | मंडळाचे विश्वस्त, कार्यकारी समिती, पदाधिकारी आणि सदस्य यांचे चर्चासत्र<br>टिक हिल रिसॉर्ट, कर्जत |
| २४ | २० फेब्रुवारी २०१६ | अनंत घोगळे यांचा सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा | कलाकारांचा सांस्कृतिक कार्यक्रम<br>सीमा पारकर, अमित सोलंकी, तृप्ती जाधव, दिपक पाटील |

## क्रीडा विभाग

### कबड्डी महिला

## महिला कबड्डी संघाची उल्लेखनीय कामगिरी.

- **मुंबई शहर किशोर**–किशोरी अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत अजिंक्यपद संपादन करुन मुंबई जिल्ही संघात **कु. दिव्या रेडकर, कु. दिव्या यादव** व **कु. नम्रता कुंभार** यांची निवड करण्यात आली.
- **मुंबई शहर कुमार** – मुली अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत तृतीय क्रमांक संपादन करुन **कु. तेजश्री सारंग** व **कु. दिव्या रेडकर** यांची निवड झाली.
- उत्तर प्रदेश येथे झालेल्या मुलींच्या **राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत कु. तेजश्री सारंग** हिची निवड झाली.
- उज्जेन येथे झालेल्या मुलींच्या **राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत कु. तेजश्री सारंग** हिची निवड झाली.
- **मुंबई शहर महिला संघात कु. तेजस्वीनी पोटे** हिची निवड झाली.
- **शिवशाही चषक मुंबई शहर** संघातून **कु. तेजस्वीनी पोटे** व **कु. श्रद्धा कदम** हिची निवड झाली.

**सांघिक यश :–**

- **शिवनेरी क्रीडा मंडळ**, दादर आयोजित महिला स्पर्धेत **उपविजेते पद संपादन केले**. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई **कु. दिप्ती पारकर** व उत्कृष्ट पकड **कु. तेजस्वीनी पोटे** यांना पारितोषिक मिळाले.
- **रामसेवक क्रीडा मंडळ**, चिंचपोकळी आयोजित स्पर्धेत अजिंक्यपद संपादन केले. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई **कु. श्रद्धा कदम** व उत्कृष्ट पकड **कु. तेजश्री सारंग** यांना पारितोषिक मिळाले.
- **राष्ट्रीय मिल मजदूर संघ, परळ** स्पर्धेत **अजिंक्यपद संपादन** केले. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई **कु. दिप्ती पारकर** व उत्कृष्ट पकड **कु. तेजश्री सारंग** यांना पारितोषिक मिळाले.
- **क्रांती क्रीडा मंडळ**, घाटकोपर आयोजित स्पर्धेत **उपविजेते संपादन केले**. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडू **कु. दिप्ती पारकर** व उत्कृष्ट पकड **कु. श्रद्धा कदम** यांना पारितोषिक मिळाले.
- **दुर्गामाता स्पोर्ट्स क्लब, शिवडी** आयोजित स्पर्धेत अजिंक्यपद संपादन केले. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई **कु. प्रियंका कोठेकर** व उत्कृष्ट पकड **कु. तेजश्री सारंग** यांना पारितोषिक मिळाले.
- **यंग उमरखाडी, उमरवाडी** आयोजित स्पर्धेत **अजिंक्यपद संपादन केले**. या स्पर्धेत उत्कृष्ट चढाई **कु. दिप्ती पारकर** व उत्कृष्ट पकड **कु. तेजश्री सारंग** यांना पारितोषिक मिळाले.

## कबड्डी पुरुष

## पुरुष कबड्डी संघाची उल्लेखनीय कामगिरी.

- **वंदे मातरम् क्रीडा मंडळ**, लोअर परळ आयोजित स्पर्धेत **तृतीय क्रमांक** संपादन केला.
- **कारनार वाडी वेल्फेअर सेंटर**, दादर आयोजित कबड्डी स्पर्धेत **अंतिम विजेतेपद संपादन** केले.
- या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूंचा मान **कु. निशांत देव्हारकर** यांनी मिळविला.
- **अमर क्रीडा मंडळ** आयोजित स्पर्धेत **उत्कृष्ट खेळाडू कु. आदित्य पोफळकर** ठरला.
- **महर्षी दयानंद महाविद्यालयाचा** सन २०१५-१६ चा सर्वोत्कृष्ट खेळाडू **कु. अनिकेत पेवेकर ठरला.**
- **राष्ट्रीय शालेय स्पर्धेत** महाराष्ट्राच्या संघातून **कु. निशांत देव्हारकर** यांची निवड करण्यात आली.
- **ओम ज्ञानदिप क्रीडा मंडळ** प्रभादेवी आयोजित कुमार गट कबड्डी स्पर्धेत उपविजेते पद व स्पर्धेतील शिस्तबद्ध संघाचे पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडूचे पारितोषिक **कु. अनिकेत पेवेकर** यांस मिळाले.

## खो-खो संघांचे सांघिक यश

- ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आयोजित पुरुष/महिला अजिंक्यपद निवड चाचणी खो-खो स्पर्धा दि. २९ ते ३१ सप्टेंबर २०१५ रोजी ओम समर्थ भारत यांच्या मैदानावर घेण्यात आली. सदर स्पर्धेत महिलांच्या गटाने **तिसरा क्रमांक** मिळविला. **कु. मधुरा पेडणेकर व कु. संजना कुडव** यांची मुंबईच्या **महिला संघात निवड करण्यात आली.**
- ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आयोजित कुमार/मुली अजिंक्यपद निवड चाचणी खो-खो स्पर्धा दि. ३० ते १ सप्टेंबर २०१५ रोजी ओम समर्थ भारत यांच्या मैदानावर घेण्यात आली. सदर स्पर्धेत मुलींच्या गटाने प्रथम क्रमांक मिळविला. **कु. मधुरा पेडणेकर, कु. तन्वी उपळकर व कु. संजना कुडव** यांची मुंबईच्या मुलींच्या संघात निवड करण्यात आली. तसेच **कु. संजना कुडव** हिला सर्वोत्कृष्ट सरंक्षकाचे पारितोषिक मिळाले.
- महिला क्रीडा महोत्सव आयोजित मुंबई जिल्हा क्रीडा अधिकारी महिला खो-खे स्पर्धा दि. २१ व २२ ऑक्टोबर २०१५ रोजी सायन डि. एस. ओ. ऑफिस येथे घेण्यात आली. **या स्पर्धेत महिलांना प्रथम क्रमांक पटकावला.**
- महिला क्रीडा महोत्सव आयोजित विभागीय क्रीडा अधिकारी महिला खो-खो स्पर्धा दि. ८ नोव्हेंबर २०१५ रोजी **कोपर खौराणे** येथे घेण्यात आली. या स्पर्धेत महिलांनी **तिसरा क्रमांक** पटकावला.
- ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर आयोजित कुमार/मुली निमंत्रित खो-खो स्पर्धा दि. ४ ते ६ जानेवारी २०१६ रोजी ओम समर्थ भारत यांच्या मैदानावर घेण्यात आली. सदर स्पर्धेत मुलींच्या गटाने द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेत **कु. मधुरा पेडणेकर** हिला **सर्वोत्कृष्ट सरंक्षकाचे पारितोषिक** मिळाले.

- दि. ९ ते १३ जानेवारी २०१६ लालबाग येथे **ओम साईश्वर क्रीडा मंडळ** आयोजित मुंबई महापौर चषक स्पर्धेत अमर हिंद मंडळाच्या पुरुष संघाला **चतुर्थ क्रमांक** मिळविला.

- **कुमार / मुली जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा** दि. ३० ऑगस्ट ते २ सप्टेंबर २०१५ अमर हिंद मंडळाच्या कुमार संघाला **तृतीय क्रमांक** मिळाले, स्थळ : ओम समर्थ

**खो–खो खेळाडू व प्रशिक्षक यांची खो–खो क्षेत्रातील वैयक्तिक कामगिरी**

- **४२ वी कुमार–मुली राज्य अजिंक्यपद खो–खो स्पर्धा** जळगांव येथे झाली या स्पर्धेत **कु. तन्वी उपळकर, संजना कुडव व कु. मधुरा पेडणेकर** यांची निवड झालेली होती. **मुंबई शहर** संघाला चौथा क्रमांक मिळाला.

- **५२ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी खो–खो स्पर्धा** दि. ८ ते ११ ऑक्टोबर २०१५ रोजी **सातारा फलटन** येथे झाल्या. स्पर्धेतून मुंबई संघात **कु. मधुरा पेडणेकर** व **कु. संजना कुडव** यांची निवड करण्यात आली होती.

- **प्रसाद राडिये** दिनांक ८ ते ११ ऑक्टोबर २०१५ फलटण येथे झालेला राज्य अजिंक्यपद खो–खो स्पर्धेत मुंबईचे प्रतिनिधित्व व पश्चिम रेल्वे संघात निवड.

- **तरुण मिस्त्री** : कुमार/मुली राज्य अजिंक्यपद स्पर्धा दि. १ ते ४ ऑक्टोबर २०१५ जळगाव येथे झालेल्या ४२ वी कुमार/मुली राज्य अजिंक्यपद स्पर्धेत मुंबई संघाचे नेतृत्व करुन द्वितीय क्रमांक संपादन केले.

- **५२ वी पुरुष–महिला राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी खो–खो स्पर्धा** दि. ८ ते ११ ऑक्टोबर २०१५ रोजी सातारा फलटन येथे झाल्या. या स्पर्धेत मुंबईच्या पुरुष संघाचे व्यवस्थापक म्हणून **श्री. प्रफुल्ल दामोदर पाटील** यांची निवड करण्यात आली तसेच या स्पर्धेत मुंबईच्या महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून **श्री. जतिन गजानन टाकळे** यांची निवड करण्यात आलेली होती.

- **किशोर–किशोरी निवड चाचणी अजिंक्यपद स्पर्धा** ही सरस्वती यांनी माहिम येथे नारळी बागेत आयोजित केली होती. या स्पर्धेत निवड चाचणी सदस्य म्हणून श्री. रोहन चव्हाण यांची निवड करण्यात आलेली होती.

पुणे महापौर राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेत मुंबईकडून १९ वर्षाखालील स्पर्धेत मंडळाचे खालील खेळाडूंची निवड झाली असून सदर स्पर्धेत मुंबईच्या संघाला प्रथम स्थान प्राप्त केले तर **कु. निरव पाटील** याला उत्कृष्ट सरंक्षक **व कु. किरण कर्णावर** याला अष्टपैलू खेळाडूचे पारितोषिक मिळाले.

१. निरव पाटील २. किरण कर्णावर ३. सुनिल गुरखे ४. प्रसाद भाटकर ५. रुतिक शिवलकर
६. राहुल नाटेकर ७. साईनाथ पाटील ८. अनिकेत परमार ९. रोशन खैर
अभिषेक कागडा – प्रशिक्षक आदेश कागडा – व्यवस्थापक

## -: शालेय क्रीडा स्पर्धा :-

अमर हिंद मंडळ, शालेय क्रीडा स्पर्धा २०१५-१६ ह्या दि. १८ ते २१ जानेवारी २०१६ या कालावधीत दरवर्षीप्रमाणे या वर्षीही घेण्यात आल्या. सदर स्पर्धेच्या समिती मध्ये स्पर्धा प्रमुख श्री. रमेश वरळीकर असून त्यांच्यासोबत श्री. संजय पेडणेकर, प्रफुल्ल पाटील, श्री. विजय राणे, श्री. रमेश नाटेकर व श्री. जतिन टाकळे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यास मदत केली.

**खो-खो :-**

खो-खो स्पर्धेच्या उद्घाटनासाठी **श्री. तेजस शिरसकर हे खो-खो तील छत्रपति पुरस्कार विजेते** खेळाडू प्रमुख पाहुणे लाभले होत. खो-खोच्या स्पर्धेत मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे अशा तिन्ही जिल्हातली शाळांचा समावेश केला होता. एकूण मुला-मुलींचे १४/१२ संघ सहभागी झाले होते. खो-खोच्या स्पर्धेत क्रीडांगण व पंच अशी सर्व जबाबदारी मंडळातील खो-खो खेळाडूंनी घेतली होती. त्यानुसार सर्व सामने दि. १८ व १९ जानेवारी २०१६ रोजी सुव्यवस्थीत पार पडले. खो-खोच्या बक्षिस वितरण समारंभासाठी श्री. संजय पाटील सानेगुरुजी शाळेचे मुख्याध्यापक हे प्रमुख पाहुणे लाभले होते. एक खेळाडूच खेळाचे महत्व जाणू शकतो हे त्यांच्या संभाषणातून त्यांनी मुलांना समजावून सांगितले.

**लंगडी :-**

लंगडी स्पर्धेच्या उद्घाटन अमर हिंद मंडळाचे, **उपाध्यक्ष श्री. चिंतामणी नागले** यांच्या हस्ते करण्यात आले. लंगडी स्पर्धेत सुद्धा मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे अशा तिन्ही जिल्ह्यातील शाळांचा समावेश केला होता. यावर्षी प्रथमच आपण साखळी आणि बाद पद्धतीप्रमाणे मुला/मुलींचे सामने खेळवण्यात आले. सदर स्पर्धेत मुला/मुलींचे ०८/०८ संघ सहभागी झाले होते. लंगडीच्या स्पर्धेत क्रीडांगण व पंच अशी सर्व जबाबदारी मंडळातील खेळाडूंनी घेतली होती. त्यानुसार सर्व सामने दि. २० जानेवारी २०१६ रोजी सुव्यवस्थित पार पडले. लंगडीच्या बक्षिस वितरण समारंभ श्री.बाळ वाडवलीकर, क्रीडा संघटक यांच्या हस्ते करण्यात आला.

**कबड्डी :-**

कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनासाठी **श्री. ओमकार सिंग,** भारतीय हॉकी संघाचे **ऑलपियन गोल्ड मेडालिस्ट,** सेंट्रल रेल्वे टीसी इनचार्ज व सध्या खालसा कॉलेजचे स्पोट्र्स डायरेक्टर तसेच त्यांच्यासोबत **श्री. शेखर शेट्टी, भारतीय कबड्डी संघाचे माजी कर्णधार व शिवछत्रपती पुरस्कार विजेते** कबड्डी पटू लाभले होते. कबड्डी स्पर्धेत प्रामुख्याने मुंबई शहरातील शाळांचा समावेश केला होता. एकूण मुलांचे ८ तर मुलींचे १२ संघ सहभागी झाले होते. त्यानुसार सर्व सामने दि. २१ जानेवारी २०१६ रोजी सुव्यवस्थीत पार पडले, कबड्डीच्या स्पर्धेच्या क्रीडांगणाची सर्व जबाबदारी कबड्डीच्या खेळाडूंनी पार पाडली व एक अतिशय उत्कृष्ट दर्जाची स्पर्धा सर्व प्रेक्षकांना पहावयास मिळाली. कबड्डीच्या बक्षिस समारंभ **श्रीमती ग्रेटा डिसोजा-सिक्वेरा** (माजी भारतीय कबड्डीपटू तसेच कबड्डीच्या शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू) यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धेला सदिच्छा भेट देण्यासाठी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे संयुक्त कार्यवाह श्री. प्रभाकर अमृते उपस्थित होते. सदर स्पर्धेतील विजयी/उपविजयी यांचा पूर्ण वृत्तांत खाली दिलेल्या विवरणपत्रात नमूद केलेला आहे.

या स्पर्धेच्या प्रसिद्धीची जबाबदारी ही श्री. बाळ तोरसकर यांना सोपवलेली होती. त्यानुसार प्रत्येक दिवशी जवळ जवळ दहा ते बारा पेपरमध्ये आपल्या या क्रीडा स्पर्धेची माहिती प्रसारित होत होती.

## निकाल व पारितोषिके

### खो-खो (मुले)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | रा. फ. नाईक - ठाणे | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| द्वितीय क्रमांक | - | राजश्री शाहू महाराज, रबाळे | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| उपांत्य उपविजयी | - | महात्मा गांधी, बांद्रा | चषक |
| उपांत्य उपविजयी | - | डॉ. शिरोडकर विद्यालय, परळ | चषक |

### खो-खो (मुली)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | रा. फ. नाईक - ठाणे | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| द्वितीय क्रमांक | - | महात्मा गांधी, बांद्रा | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| उपांत्य उपविजयी | - | आ.ई.एस. मॉर्डन, दादर | चषक |
| उपांत्य उपविजयी | - | डॉ. शिरोडकर विद्यालय, परळ | चषक |

### लंगडी (मुले)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | सोशल सर्व्हीस लीग, परळ | चषक व आकर्षक भेटवस्तू (१७) |
| द्वितीय क्रमांक | - | डॉ. नरवणे हायस्कूल | चषक व आकर्षक भेटवस्तू (१७) |
| उपांत्य उपविजयी | - | श्री गणेश हायस्कूल | चषक |
| उपांत्य उपविजयी | - | डॉ. शिरोडकर विद्यालय, परळ | चषक |

### लंगडी (मुली)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | आय. ई. एस. मॉर्डन इंग्लिश स्कूल | चषक व आकर्षक भेटवस्तू (१७) |
| द्वितीय क्रमांक | - | डॉ. शिरोडकर विद्यालय, परळ | चषक व आकर्षक भेटवस्तू (१७) |
| उपांत्य उपविजयी | - | शिशुविकास विद्यालय | चषक |
| उपांत्य उपविजयी | - | श्री गणेश विद्यालय | चषक |

### कबड्डी (मुले)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | शारदाश्रम विद्या मंदिर | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| द्वितीय क्रमांक | - | ना. म. जोशी मार्ग | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| उपांत्य उपविजयी | - | प्रभादेवी म. न. पा. शाळा | चषक |
| उपांत्य उपविजयी | - | बालमोहन विद्यामंदिर | चषक |

### कबड्डी (मुली)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | - | महात्मा फुले कन्या शाळा | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| द्वितीय क्रमांक | - | ना. म. जोशी मार्ग | चषक व आकर्षक भेटवस्तू (१४) |
| उपांत्य उपविजयी | - | प्रभादेवी म. न. पा. शाळा | चषक |
| उपांत्य उपविजयी | - | डॉ. शिरोडकर हायस्कूल | चषक |

## कलाविभाग

मंडळाच्या कला विभाग कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा यांचे आयोजन यशस्वीपणे करीत आहे. बालनाट्य प्रशिक्षण शिबिराला विक्रमी प्रतिसाद मिळाला तर नाट्यतंत्र प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून ताज्या दमाचे कलाकार मिळाले. मंडळाने दरवर्षीप्रमाणे महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत, महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत भाग घेतला. दिर्घांक स्पर्धा, विविध एकांकिका स्पर्धांमध्ये भाग घेतला. सामाजिक संस्थांसाठी त्यांच्या दारी जावून सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याचा उपक्रम हाती घेतला.

मंडळाचे कलाकार सीमा पारकर, जितेंद्र आगरकर, भूषण गमरे, चंदन जमदाडे, अमित सोलंकी, आदेश वढावकर, निलम बांदल इत्यादिंनी व्यावसायिक रंगभूमीवर आपली कारर्किद सुरु केली आहे. कलाविभाग प्रमुख दत्ता सावंत यांच्या नेतृत्वाखाली तसेच लीला हडप, हेमा घरत, जितेंद्र आगरकर, चंदन जमदाडे, अमित सोलंकी, भूषण गमरे यांच्या सहकार्याने कलाविभाग प्रगती करीत आहे. संजय भाटकर, संजय तोडणकर, राजन कदम, मृणाल चेंबुरकर, संजय क्षेत्रकल्याणी, पंकड चेंबुरकर, शिवदास घोडके, संजय डहाळे इत्यादींचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. ऐश्वर्या सक्रे, अदिती राणे, अपेक्षा नार्वेकर, जुई सावंत, शंतनु रांगणेकर, अविनाश नागटिळक, तृप्ती जाधव, दिपक गिरकर, केशव दवरे, प्रिती शिंदे, सुप्रिया कांबळे, चंदन सुत्रे इत्यादी कलाकारांची नवीन फळी तयार होत आहे.

- साहित्य संघ मंदिर या संस्थेचा नाट्यक्षेत्रात कार्यरत असलेली संस्था पुरस्कार प्राप्त झाला.
- ऑर्गन डोनेशनवर आयोजित केलेल्या लघुचित्रपट स्पर्धेत मंडळाचे तहहयात सभासद श्री. सुरेंद्र नाईक, श्री. अमित सोलंकी, श्री. मकरंद सावंत यांच्या लघुचित्रपटांनी पारितोषिके पटकावली.
- श्री. संजय तोडणकर यांना सर्वोत्कृष्ट प्रकाश योजनेचा झी गौरव पुरस्कार प्राप्त झाला.

## समाजकल्याण मदत निधी

- आधार, बदलापूर : रु. २,५०,०००/–, आवाहन पालक संघ, मुंबई : रु. ५०,०००/–
  जनहित बहुउद्देशीय मतिमंद शाळा : रु. ५०,०००/–, नर्मदा नवनिर्माण : रु. १,००,०००/–
  सार्वजनिक वाचनालय, शाहबाद–अलिबाग : रु. १०,०००/–

## वैदयकीय मदत निधी

- कमलाधाम वृद्धाश्रम : रु. १,००,०००/–, गोपरी आश्रम, कणकवली रु. २५,०००/–
  नाना पालकर स्मृती समिती रु. १,००,०००/– साने गुरुजी रुग्ण सहाय्य ट्रस्ट रु. ५०,०००/–,
  शुश्रुषा हॉस्पिटल रु. २५,०००/–

## शैक्षणिक मदत निधी

- सातमाई देवी विद्याप्रसारक संस्था रु. ५०,०००/–, विलास पवार रु. ५,०००/–
  अमेय पालक संघ रु. ५०,०००/–, श्री गणेश बहुउद्देशीय संस्था रु. ५०,०००/–
  निराधार प्रतिष्ठान रु. ४०,०००/–, एल. एम. टी. स्कूल ऑफ डेफ चिल्ड्रन्स रु. ४३,६००/–
  मुलांना वह्या वाटप रु. ८०,०००/– वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या मंडळाच्या खेळाडूंचा शैक्षणिक गुणगौरव : रु. २४,५००/– आदेगाव स्कूल : रु. १२,०००/–, मुलांना शिष्यवृत्ती : रु. ७५,०००/–
  MSCIT मुलांना फी : १९,७५०/–

## विशेष अभिनंदनीय

- **कु. अनिकेत आडारकर** ने बँकॉक येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय लंगडी स्पर्धेत **भारताचे कर्णधार पद** भूषविले.
- **महिला महा कबड्डी स्पर्धेत कु. दिप्ती पारकर** हिचे **ठाणे टायगर व कु. तेजस्वीनी पोटे** हिचे **रायगड डायनामॉस** मधून निवड.

## सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय आणि सांस्कृतिक कार्य करणाऱ्या समाजसेवी संस्थांना विनामूल्य/सवलतीच्या दरात सभागृह

- यंगभारत सेवा मंडळ, प्रभादेवी • 'संवाद' ज्येष्ठ नागरिक संघ • नाईक मराठा मंडळ, मुंबई
- परब मराठा समाज • शिवनाथ शिक्षण प्रसारक संस्था • सी.के.पी. सभा, दादर
- ॲड. गिरीष राऊत – भारतीय पर्यावरण चळवळ • सी.के.पी. एज्युकेशन सोसायटी, दादर
- करकरे ॲकॅडमी • संदिप देशपांडे (मनसे) • स्त्री मुक्ती संघटना
- भाटिया भुवन गणेशोत्सव मंडळ • मावा संघटना
- आय. ई. एस. महात्मा ज्योतिबा फुले शाळा, दादर

## इतर संकीर्ण

• खेळाडूंना गणवेश • कर्मचारी गणवेश • नवीन कॉम्प्युटर खरेदी • दिवाळी भेटकार्ड

## –: समारोप :–

मंडळाने गेल्या वर्षभरात अनेक नवीन गोष्टींची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. मंडळाचा कारभार समर्थपणे पेलण्यासाठी भावी पिढी तयार करण्याच्या उपक्रमात अनेकांनी सहभाग नोंदवला. संघ बांधणी अधिक सक्षमपणे व्हावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मंडळाच्या कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा यांच्या आयोजनासाठी तसेच निधींचा योग्य विनियोग करण्यासाठी जास्तीत जास्त तहहयात सभासद, खेळाडू, कलाकार यांना मंडळाच्या कार्यात सामावून घेण्याचे काम सुरु झाले आहे. मंडळाचे क्रीडाविभाग, कलाविभाग, आपापल्या कीर्तीला साजेसे कार्य करीत आहेत. संजय पेडणेकर, विजय राणे, प्रफुल्ल पाटील, विलास कारेकर, सीमा कोल्हटकर, जतिन टाकळे, रोहन चव्हाण, अमित चिखलकर, अमित संत, साईनाथ काळसेकर, लीला हडप, हेमा घरत, अनंत घोगळे, योगेंद्र माने, सीमा पारकर, चंदन जमदाडे, जितेंद्र आगरकर, अमित सोलंकी, भूषण गमरे, रमेश नाटेकर, रमेश तांबे, नेहा खरे इत्यादींच्या उल्लेखनीय सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

मंडळाचे व्यवस्थापक सुधीर कुळकर्णी, कर्मचारी संदीप चांदे, रविंद्र भुवड यांचे दैनंदिन कामकाजात तसेच वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रम, उपक्रमांत योग्य सहकार्य मिळत आहे.

मयुर कॅटरर्सचे अविनाश पाटील, मयुर पाटील यांचे वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांत व उपक्रमांत मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

अमर हिंद मंडळाचा कार्यभार सांभाळण्यासाठी तसेच कार्यक्रमांचे आयोजन नीटपणे करण्यासाठी सर्व पदाधिकारी, सदस्य, खेळाडू, कलाकार, कार्यकर्ते येत असतात त्यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना आनंद होत आहे. पत्रकार, वृत्तपत्र, संपादक बॅंकर्स, न्यु मयुर कॅटरर्स यांचे मनपूर्वक आभार.

अहवाल कालावधीत आयोजित केलेल्या कार्यक्रमांत सहभागी होऊन सभासदांनी केलेले सहकार्य तसेच कार्यकर्ते, हितचिंतक, कलाकार, खेळाडू व मंडळाचे कर्मचारी यांनी केलेले सहकार्य याचा पुन्हा एकदा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून आणि पुढील वाटचालीत या सर्वांचे सहकार्य मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करून हा अहवाल समाप्त करीत आहे.

कळावे लोभ असावा आणि तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
**श्रीकृष्ण राणे**
कार्यवाह

**अहवाल काळात निधन पावलेल्या तहहयात सभासद तसेच मंडळाच्या ज्ञात – अज्ञात सभासद, हितचिंतक, कार्यकर्ते यांना अमर हिंद मंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली.**

## Report of an Auditor Relating to Accounts Audited under Sub-Section (2) of Section 33 & 34 and Rule 19 of the Bombay Public Trusts Act.

| | | |
|---|---|---|
| Registration No. | : | F-43 (Mumbai) |
| Name of the Public Trust | : | Amar Hind Mandal |
| For the year ending | : | 31st March, 2016 |

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules. | Yes |
| (b) | Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts | Yes |
| (c) | Whether the cash balance and the vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts. | Yes |
| (d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him | Yes |
| (e) | Whether a register or movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with; | No |
| (f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him | Yes |
| (g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust | No |
| (h) | The amounts of outstandings for more than one year and the amounts written off; if any ; | |
| (i) | Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/- | Yes |
| (j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of section 35; | No |
| (k) | Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor; | No |
| (l) | All case of irregular, illegal or improper expenditure, failure, omision, loss or waste was caused in consequence of breach of trust or mispplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust; | No |
| (m) | Whether the budget has been filed in the form provided by rule 16A; | Yes |
| (n) | Whether the maximum and minimum number of the trustees is maintained | Yes |
| (o) | Whether the meetings are held regularly as provided in such Intrument; | Yes |
| (p) | Whether the minute books of the proceedings of the meeting is maintained | Yes |
| (q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust; | No |
| (r) | Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust; | No |
| (s) | Whether any of the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit; | NA |
| (t) | Any special matter which the auditor may think fit or neccessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | Refer General Observation |

**SARAF ASSOCIATES**
Chartered Accountants
Auditors

Mumbai
Dated : 12/08/2016

# (परिशिष्ट 'अ')

## दि. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६

## संयुक्त व कार्यकारी समिती सभा उपस्थितीची माहिती

| अ. क्र. | नाव | हुद्दा | संयुक्त सभा (५) | कार्यकारी समिती सभा (१४) |
|---|---|---|---|---|
| १) | दिनकर पाटील | विश्वस्त | ५ | -- |
| २) | उषा मेहता | विश्वस्त | ३ | -- |
| ३) | रमेश वरळीकर | विश्वस्त | ५ | -- |
| ४) | भास्कर सावंत | अध्यक्ष (१२/८/२०१५ पासून | | |
| ५) | भास्कर सावंत | उपाध्यक्ष (१२/८/२०१५ पर्यंत) | ४ | -- |
| ६) | उर्मिला शेणॉय | उपाध्यक्ष | ५ | -- |
| ७) | चिंतामणी नागले | उपाध्यक्ष (१२/८/२०१५ पासून) | ३ | ४ |
| ८) | दीपक पडते | कार्याध्यक्ष | ५ | १४ |
| ९) | अरुण देशपांडे | कार्योपाध्यक्ष | ५ | १४ |
| १०) | दत्ता सावंत | कार्यवाह (३१/८/२०१५ पर्यंत) | ५ | १३ |
| ११) | श्रीकृष्ण राणे | कार्यवाह (३१/८/२०१५ पासून) | | |
| १२) | सतीश रेडीज | संयुक्त कार्यवाह (३१/८/२०१५ पर्यंत) | ५ | ११ |
| १३) | प्रफुल्ल पाटील | संयुक्त कार्यवाह (३१/८/२०१५ पासून) | | |
| १४) | श्रीकृष्ण राणे | कोषाध्यक्ष (३१/८/२०१५ पर्यंत) | ५ | १४ |
| १५) | सीमा कोल्हटकर | कोषाध्यक्ष (३१/८/२०१५ पासून) | | |
| १६) | चिंतामणी नागले | सदस्य (१२/८/२०१५ पर्यंत) | ३ | ४ |
| १७) | संजय पेडणेकर | सदस्य | ४ | १० |
| १८) | विजय राणे | सदस्य | ५ | १४ |
| १९) | प्रफुल्ल पाटील | सदस्य (३१/८/२०१५ पर्यंत) | ५ | १४ |
| २०) | सीमा कोल्हटकर | सदस्य (३१/८/२०१५ पर्यंत) | ३ | १० |
| २१) | दीपक नाडकर्णी | सदस्य | ५ | १२ |
| २२) | विलास कारेकर | सदस्य (१२/८/२०१५ पासून) | ३ | ०८ |

## अमर हिंद मंडळाची आंतर शालेय क्रिडा स्पर्धांची क्षणचित्रे




















## अमर हिंद मंडळाची आंतर शालेय क्रिडा स्पर्धांची क्षणचित्रे

















## १५ ऑगस्ट २०१५ व २६ जानेवारी २०१६ कार्यक्रमाची क्षणचित्रे



















अमर हिंद मंडळ दादर
आयोजित
वसंत व्याख्यानमाला
वर्ष ६८ वे













वसंत व्याख्यानमाला
वर्ष ६८ वे


अमर हिंद मंडळ दादर
आयोजित
वसंत व्याख्यानमाला
वर्ष ६८ वे